# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय

## वार्षिक अहवाल 2016-17

महाराष्ट्रीय मंडळाचे आद्य संस्थापक कै. कॅ. शिवरामपंत दामले व त्यानंतर मंडळाचे अध्वर्यू माजी सरकार्यवाह कै. रमेश दामले यांच्या पवित्र स्मृतिस अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2016-17 चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे. या महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बी.पी.एड्., एम.पी.एड्., एम.फिल.(शारीरिक शिक्षण)(सुटीतील) व पीएच.डी.(शारीरिक शिक्षण) हे अभ्यासक्रम राबविले जातात महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

## ठळक वैशिष्ट्ये

1) शै. वर्ष २०१६-१७ पासून बी.पी.एड व एम.पी.एड अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया ऑनलाईन
2) सालाबादप्रमाणे बीपीएड् व एमपीएड्.निकालामध्ये नेत्रदीपक यश
3) क्रीडापटूंचे राष्ट्रीय स्तरावर योगदान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघांमध्ये प्रतिनिधीत्त्व
4) पुण्यातील ८५ शाळांतील विद्यार्थ्यांसाठी Obsty Race चे महाविद्यालयामध्ये आयोजन (२५ ते २७ नोव्हेंबर २०१६)
5) महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन (दि.१४ जाने.२०१७)
6) Sports Carnival दिमाखात संपन्न (१७,१८ मार्च २०१७)
7) प्रा. कुमार उपाध्याय यांची पुणे ते कन्याकुमारी – सायकल सफारी (दि.२२ नोव्हे ते ५ डिसे.२०१६)
8) सा.फु.पुणे विद्यापीठ, (गुणवत्ता सुधार कार्यक्रम), अंतर्गत अनुदान प्राप्त
9) परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प
10) डॉ.श्रीकांत महाडिक – मणिपूर युनिव्हर्सिटी जयपूर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय शा.शि. व क्रीडाशास्त्र चर्चासत्रात सहभाग– ५–७ जाने २०१७
11) डॉ. योगेश बोडके – Indian Association of Life Skills Education – Int.National Conf. on Life skils for achieving Sustainable Development Goals 2030 (3-5 Feb.2017) at S.M.Joshi Colleg Hadpsar
12) महाविद्यालयाचे बीपीएड (प्रथम वर्ष) चे श्री कृष्णा काळे मल्लखांबपटू यांची सा. फु.पुणे विद्यापीठाचे पै. खाशाबा जाधव पुरस्कारासाठी निवड.
13) प्राईड ऑफ आगाशे पारितोषिक – सहाय्यक क्रीडसंचालक, विद्यापीठ क्रीडामंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ, डॉ. दत्ता महादम यांना जाहीर

**गतवर्षीय परीक्षा फल : सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|
| बीपीएड् (प्रथमवर्ष) | – |
| एमपीएड्.(प्रथमवर्ष) | – |
| एम.एड्.(शा.शि.) (द्वितीयवर्ष) | 92.10% |

| अभ्यासक्रम | 2016-17 मधील उत्तीर्ण | 2016-17 पर्यंत उत्तीर्ण |
|---|---|---|
| एम.फिल (शा.शि.) | 03 | 89 |
| पीअेच.डी. | 0 | 33 |
| सेट परीक्षा (निकाल मे २०१६) | 06 | |
| नेट परीक्षा (निकाल जुलै २०१६) | 05 | |

- **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम (परीक्षा मे २०१६)**
- **बीपीएड – शै. वर्ष २०१५–१६ पासून बीपीएड अभ्यासक्रम दोन वर्षांचा झाल्यामुळे मे २०१६ चा निकाल नाही.**

एम.एड्.(शा.शि.) – श्री गायकवाड केतन दीपक

दरवर्षी अनेक विद्यार्थी सेट / नेट परीक्षा उत्तीर्ण होतात. मे २०१६ मध्ये ०६ विद्यार्थी सेट परीक्षा तर जुलै २०१६ मध्ये ५ विद्यार्थी नेट परीक्षा उत्तीर्ण झाले.

- **एम.फिल (शा.शि.) पदवी प्राप्त (२०१६–१७)**

१) श्री वाडकर अजय (O Grade)२) श्री आदलिंग रोहित (O Grade)३) श्री चव्हाण राहुल (O Grade)

**प्रवेश**

**बी.पी.एड्.** या वर्षावधीत ७० विद्यार्थ्यांनी बी.पी.एड्. अभ्यासक्रम (प्रथमवर्ष) साठी प्रवेश घेतला आहे. बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या दोन तुकड्या अनुदानित आहेत.

- **एम.पी एड.** (प्रथमसत्र) या अभ्यासक्रमास १६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीयवर्ष मध्ये ४१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

- **एम. फिल्.(शा.शि.)(सुटीतील अभ्यासक्रम)**

शै. वर्ष 2016-18 मध्ये मार्गदर्शकांकडे जागा नसल्यामुळे एम.फिल (सुटीतील) अभ्यासक्रमाचे प्रवेश झाले नाहीत या वर्षावधीत ३ विद्यार्थ्यांनी एम. फिल्.(शा.शि.) पदवी प्राप्त केली.

- **पीअेच.डी.**

मे २०१६ मध्ये मार्गदर्शकांकडे जागा नसल्यामुळे पीएच.डी चे प्रवेश झाले नाहीत

- **विद्यार्थ्यांचा ओघ**

  यावर्षी महाराष्ट्र शासनाच्या सीईटी द्वारे बीपीएड (प्रथमवर्ष) अभ्यासक्रमास ७० व एमपीएड (प्रथमवर्ष) अभ्यासक्रमास १६ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यामध्ये गोवा राज्यातील ७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेउन (बी.पी.एड –०३ व एम.पी.एड ०५) महाविद्यालयास पसंती दर्शविली आहे. बीपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमास ९० व एमपीएड (द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमास ४१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

**क्रीडास्पर्धा प्राविण्य**

1) आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांचा सहभाग
2) सलग २१ व्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये पदके प्राप्त.

**क्रीडासहभाग**

महाविद्यालयामध्ये दरवर्षीच विविध क्रीडाबाबींमध्ये आंतरमहाविद्यालयीन, विभागीय व राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा सहभाग असतो. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धासामन्यांमध्ये एकूण १० सांघिक क्रीडाबाबी व ११ वैयक्तिक क्रीडास्पर्धामध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग होता.

**आंतरमहाविद्यालयीन आंतरविभागीय व राष्ट्रीय पातळी वरील सहभाग**

| स्तर | मुले | | | | मुली | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **BPEd I yr** | **BPEd II yr** | **MPEd I yr** | **MPEd II yr** | **BPEd I yr** | **BPEd II yr** | **MPEd I yr** | **MPEd II yr** | **मुले** | **मुली** |
| आंतरमहाविद्यालयीन | 44 | 77 | - | 10 | 33 | 40 | 10 | 07 | 131 | 90 |
| विभागीय पातळी | 04 | 09 | 15 | 08 | 10 | 07 | 02 | 06 | 36 | 25 |
| आंतरविद्यापीठ व अखिलभारतीय आंतरविद्यापीठ | 01 | 03 | 0 | 02 | 05 | 03 | 02 | 04 | 06 | 14 |

**आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक सहभाग – ११ क्रीडाबाबी**

| अ.क्र. | क्रीडाप्रकार | मुले | मुली |
|---|---|---|---|
| 1 | क्रॉसकंट्री | सहभाग | सहभाग |
| 2 | सायकलिंग | - | Ist place |
| 3 | कुस्ती | – | Ist place |
| 4 | कुस्ती | – | Ist place |
| 5 | कुस्ती | – | Ist place |
| 6 | ज्युदो | – | Ist place |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | ज्युदो | – | Ist place |
| 8 | बॉक्सिंग | | Ist place |
| 9 | बॉक्सिंग | IInd place | IInd place |
| 10 | पॉवर लिफ्टिंग | IIIrd place | - |
| 11 | मल्लखांब | Ist place | - |

**महाविद्यालयाचे सांघिक बाबीं मधील यश– १० क्रीडाबाबी**

प्रथम क्रमांक – ०३, द्वितीय क्रमांक – ०२ , तृतीय क्रमांक – ०२

| अ.क्र. | क्रीडाबाबीचे नांव | आंतरमहाविद्यालयीन स्तर | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | ॲथलेटिक्स | सहभाग | सहभाग |
| 2 | बेसबॉल | प्रथम क्रमांक | चतुर्थ क्रमांक |
| 3 | बास्केटबॉल | सहभाग | – |
| 4 | फुटबॉल | सहभाग | द्वितीय क्रमांक |
| 5 | हॅन्डबॉल | तृतीय क्रमांक | सहभाग |
| 6 | कबड्डी | चतुर्थ क्रमांक | – |
| 7 | खो खो | सहभाग | प्रथम क्रमांक |
| 8 | हॉकी | द्वितीय क्रमांक | – |
| 9 | सॉफ्टबॉल | तृतीय क्रमांक– | - |
| 10 | व्हॉलीबॉल | प्रथम क्रमांक | सहभाग |

**खुल्या क्रीडास्पर्धा सामन्यांमध्ये आमच्या खेळाडूंचा वैयक्तिक सहभाग पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | नांव | क्रीडाबाब | निकाल |
|---|---|---|---|
| 1 | अनिता निकम<br>बीपीएड् (I yr) | ज्युदो<br>४४ वी सिनि.ज्युदो<br>चॅम्पियनशिप स्पर्धा चेन्नई | सहभाग |
| 2 | कृष्णा काळे<br>बीपीएड् (I yr) | मल्लखांब (सांघिक)<br>(वैयक्तिक )<br>**साधन विजेतेपद**<br>टांगता मल्लखांब<br>पुरलेला मल्लखांब<br>रोप मल्लखांब<br>३३ वी राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धा मध्यप्रदेश | प्रथम<br>प्रथम<br><br>प्रथम<br>द्वितीय<br>पाचवा |

- **पंच कार्य –**

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/ राज्यस्तरीय /जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन पंचकार्य करतात. प्रा. शिरिष मोरे पंचकार्य विभाग सांभाळतात. रोख

पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात.यंदा महाराष्ट्र कारागृह कर्मचा–यांच्या राज्यस्तरीय वार्षिक क्रीडास्पर्धासाठी ०७ विद्यार्थ्यांनी पंचकार्य केले.

- **विशेष कामगिरी**

**बीपीएड (प्रथम वर्ष) च्या श्री कृष्णा काळे या मल्लखांबपटूची सा. फु.पुणे विद्यापीठाच्या पै. खाशाबा जाधव पुरस्कारासाठी निवड.** (सर्वोत्कृष्ट खेळाडू – पुरूष विभाग) सुवर्णपदक व रोख रक्कम रू. ५१,०००/– असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## आयोजन

- **आंतरमहविद्यालयीन स्पर्धा आयोजन**

महाविद्यालय, स्पर्धा सहभागाबरोबरच विविध पातळींवरील स्पर्धांचे आयोजन करते. ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्पर्धा आयोजनाचाही अनुभव मिळतो.यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल व हॅन्डबॉल (पुरुष व महिला), फुटबॉल (महिला) व आंतर. विभागीय बास्केटबॉल व फुटबॉल (महिला) या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाने केले.

- **Sports and Fitness Carnival**

सालाबादप्रमाणे चंद्रशेखर आगाशे कॉलेज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभाग यांच्या संघांमध्ये. 16 व 17 मार्च 2017 रोजी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यांत आले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागातील आणि आगाशे महाविद्यालयातील एमपीएडचे विद्यार्थी,यांमध्ये प्रश्नमंजूषा सदर, फुटबॉल,क्रॉसफिट,बास्केटबॉल व क्रिकेट या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. यामध्ये सर्वसाधारण विजेतेपद व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभागाने पटकाविले. शै. वर्ष २०११–१३ च्या विद्यार्थ्यातर्फे दरवर्षी ह्या कार्निव्हलमधील प्रत्येक बाबीसाठी क्रीडाचषक पुरस्कृत करण्यात येतात.त्याचप्रमाणे कै. शैलेश जगताप यांचे स्मरणार्थ उदयोन्मुख खेळाडूस शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. सांस्कृतिक कार्यक्रमही विद्यार्थ्याद्वारे सादर करण्यात आले. स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ **श्री कटारिया** यांचे हस्ते संपन्न झाला. **प्रा.कुमार उपाध्याय** यांनी या स्पर्धांचे संयोजन केले.

- **प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेच्या ०६ शाळा व वाणिज्य महाविद्यालयासह एकत्रितपणे भव्य स्वरूपात आयोजन करण्यांत आले.

- **आंतरकुल स्पर्धा –**

हा बीपीएड् अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा–या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम. यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धांचे आयोजन व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यांत येते. दर शनिवारी आयोजित होणा–या आंतरकुल स्पर्धांमध्ये बीपीएड (द्वितीयवर्ष) विद्यार्थ्यांच्या दोनवर्षात एकूण १७ क्रीडाबाबींच्या स्पर्धा आयोजित करण्यांत

आल्या. विविध स्पर्धांमध्ये शिवाजी कुल व विद्यार्थिनींमध्ये वंदना ही कुले अव्वल स्थानी आहेत. बीपीएड प्रथमवर्ष विद्यार्थ्यांच्या यंदा एकूण ०८ क्रीडाबाबींच्या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. यामध्ये शिवाजी कुल व विद्यार्थिनींमध्ये वंदना ही कुले अव्वल स्थानी आहेत.

- **ॲथलेटिक मीट –(दि.२१ व २२ मार्च २०१७)**

सालाबादप्रमाणे ३५ वी ॲथलेटिक मीट (मैदानी क्रीडामहोत्सव) थाटात संपन्न झाली. या स्पर्धेत महाविद्यालयातील प्राध्यापक व सर्व विद्यार्थी सहभागी झाले. यामध्ये एकंदर २६ क्रीडाबाबींचा समावेश होता. सर्व क्रीडाबाबीत एक सुवर्ण,एक रौप्य व एक कांस्य पदक विजयी खेळाडूंना प्रदान करण्यांत आले. एकूण **३८ सुवर्ण**, ३८ **रौप्य** व ३८ **कांस्य** पदके व प्रमाणपत्रके प्रदान करण्यांत आली व डॉ. अमीत प्रभू, एमपीएड. द्वितीय वर्ष यांच्या तर्फे पारितोषिके वितरैत करण्यात आली. खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रभारी प्राचार्य, डॉ.सोपान कांगणे, डॉ.प्रभू, प्रशासकीय सेवक सौ. उदगीर यांच्या वतीने व कै. शैलेश जगताप यांच्या स्मरणार्थ २०१२–१३ च्या बॅचचे विद्यार्थी तसेच महाविद्यालयातर्फे पारितोषिके प्रदान करण्यांत आली.

मैदानी क्रीडा स्पर्धा विजेतेपद पुरूष विभागात अशोक **कुलाने** तर महिला विभागात प्रेरणा **कुलाने** मिळविले.

बीपीएड व एमपीएडच्या विद्यार्थ्यांनी सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली व सेवकांच्या सहकार्याने मैदानी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्या.

- **शा.शि. शिक्षकांची सभा**

बी.पी.एड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा ५ आठवड्यांचा छात्रसेवा कार्यक्रम पुणे शहरातील ५० शाळांमध्ये राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कार्यानुभवाचा आढावा घेण्यासाठी या शाळांतील शा.शि.शिक्षक व मुख्याध्यापक यांची सभा ४ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले.

- **फ़िटनेस ॲन्ड लाईफस्टाईल विषयक राज्यस्तरीय कार्यशाळा**

सा.फु.पुणे विद्यापीठाच्या गुणवत्तासुधारकार्यक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये दि. १४ जानेवारी २०१७ रोजी फ़िटनेस ॲन्ड लाईफस्टाईल विषयक राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

लोणावळा योग इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ.मन्मथ घरोटे यांच्या योग व जीवनशैली या विषयावरील भाषणाने कार्यशाळेस प्रारंभ झाला. डॉ. सोनाली सिन्हा यांनी पोषक आहाराविषयी मार्गदर्शन केले तर पीएचडीचे विद्यार्थी श्री धर्मेंद्र यांनी टेस्टिंग ॲन्ड मेजरमेंट या विषयावर व्याख्यान दिले.कार्यशाळेसाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.डॉ. बालाजी पोटे या कार्यशाळेचे समन्वयक होते.

- सा.फु.पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत शै. वर्ष २०१६–१७ मध्ये महाविद्यालयामध्ये दि. १४ व १५ फेब्रुबारी २०१७ या कालवधीमध्ये Current Status of Physical Education & Sports या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभागाचे प्रमुख मा. डॉ.संजीव सोनवणे यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उदघाटन झाले. मा. श्री सुरेश तळवलकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. सोनवणे यांनी उदघाटन प्रसंगी आपल्या बीजभाषणाद्वारे सध्याचे शारीरिक शिक्षण हे काळानुरूप कसे बदलले पाहिजे हे विशद करून सांगितले. त्यानंतर क्रिकेट कोच डॉ. अतुल यांनी उत्तम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून खेळाडू , क्रीडामार्गदर्शक व पालक यातील नातेसंबंध मानसशास्त्रीय दृष्ट्या स्पष्ट केले. या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये एकूण १२ अभ्याससत्रे , ३ परिसंवाद व ०२ प्रात्यक्षिक सेशन्स संपन्न झाली. चर्चासत्रासाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक, आजी व माजी विद्यार्थी असे १५० जण उपस्थित होते.चर्चासत्रामध्ये एकूण ५० शोधनिबंध सादर करण्यात आले. दोन्ही दिवशी सहभागींचा प्रतिसाद उत्तम होता. प्रभारी प्राचार्य, डॉ. सोपान कांगणे यांनी संचालक म्हणून तर डॉ. अरूण शिंदे यांनी चर्चासत्राचे समन्वयक म्हणून चर्चासत्राचे काम पाहिले. चर्चासत्र यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थीवृंद यांचे उत्तम सहकार्य लाभले.

- **सेट वर्कशॉप –**

पद्व्युत्तर विद्यार्थ्यांसाठी SET परीक्षा मार्गदर्शनासाठी दि.१६ ते १९ मार्च २०१७ या कालावधीत समन्वयक – डॉ शरद आहेर यांनी आपल्या सहका–यांच्या सहाय्याने यशस्वीरित्या कार्यशाळेचे आयोजन केले ४० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

- **अडथळा शर्यत (**Obstyrace)

  महाराष्ट्रीय मंडळाचे प्रमुख ध्येय म्हणजे समाजात खेळाचा, शारीरिक सुदृढतेचा आणि शारीरिक शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे.त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रीय मंडळ व चंद्रशेखर आगाशे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २७ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत आयोजित दुस–या आंतरशालेय अडथळा शर्यतींचे उदघाटन पुणे शहराचे पोलिस उपायुक्त डीएसपी श्री पंकज डहाणे आणि श्री राजेंद्र भिडे महाराष्ट्रीय मंडळाचे सरकार्यवाह श्री धनंजय दामले यांचे हस्ते झाले. पुणे जिल्हयातील ५० मुलांच्या आणि ३५ मुलींच्या अशा एकूण ८५ शालेय संघांनी या स्पर्धेत उस्फुर्त सहभाग घेतला.

  प्राथमिक फेरीमध्ये एकूण १० अडथळे विद्यार्थ्यांनी पार करावयाचे होते. ज्यामध्ये, सरपट्रणे, तोल सांभाळणे, ढांगा टाकणे, उंचावरुन उडी मारणे, टायरमधुन जाणे, जड बॅगा वाहून नेणे या अडथळ्यांचा समावेश होता. अंतिमफेरीसाठी १२ अडथळे ठेवण्यात आले होते. पारितोषिक वितरण समारंभामध्ये, विजेत्या संघास रु.२५,०००/– उपविजेत्यास रु.२०,०००/– तर तृतीय संघास रु.१५,०००/– रु.ची पारितोषिके करंड्क व

प्रत्येक खेळाडूस पदके देऊन गौरविण्यांत आले. तर सर्वात वेगवान स्पर्धा पूर्ण करणा–या खेळाडूस द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास अनुक्रमे रु.२०००/– व रु.१०००/– ची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. या उपक्रमाची शाळा, पालकवर्ग, शिक्षक व विद्यार्थी यांनी प्रशंसा केली.

- **प्रबोधनवर्ग**

शिक्षण मंडळ पुणे, महानगरपालिकांच्या शाळांच्या शारीरिक शिक्षण शिक्षकांसाठी सप्टेंबर २०१६ मध्ये ३ दिवसांच्या प्रबोधनवर्गाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २०० क्रीडाशिक्षकांचा सहभाग होता या वर्गाचे संयोजन प्राध्यापकांच्या सहाय्याने डॉ उज्वला राजे यांनी केले

- **कमवा व शिका योजना**

कमवा शिका योजनेमध्ये निवडसमितीद्वारा बी.पी.एड्. प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या एकूण २७ विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थितीनुसार निवड करण्यांत आली. वैयक्तिक माहिती घेऊन गरजू विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी करून घेतले. १४ विद्यार्थी व १३ विद्यार्थिनी असे एकूण २७ विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका,व सायंकालीन क्रीडावर्ग राबविणे,ग्रंथालय,संगणककक्ष,साहित्यखोली, क्रीडांगण इत्यादींची देखभाल, वृक्षसंवर्धन आणि परिसर स्वच्छता अशी उत्साहाने कामे केली. डॉ बी एस. पोटे या योजनेचे समन्वयक होते.

- **शिबिर, सहली व परिषदांमध्ये सहभाग**

डॉ. अमित प्रभू यांच्या नेतृत्त्वाखाली बीपीएड (प्रथम व द्वितीयवर्ष) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची सहल लोणावळा वेट ॲन्ड एन्ज़ॉय वॉटरपार्क व सिंहगड येथे गेली होती.डॉ. अमित प्रभू

- **टूर दे डॅम**

शै. वर्ष २०१६–१७ मध्ये एमपीएड प्रथम व द्वितीयवर्ष विद्यार्थ्याची टूर दे डॅम सायकल ट्रीप दि. ३०/९ व १ /१०/२०१६ या कालवधीत आयोजित करण्यात आली. सदर सायकल ट्रीपचा एकूण मार्ग १२४ कि.मी.चा होता, ज्यामध्ये पहिल्या दिवशी एकूण ९४ कि.मी. चा प्रवास करण्यात आला. दिवस अखेर सायंकाळी खानापूर येथील स्नेहसदन येथे मुक्काम करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी जीवनमूल्यांवर आधारीत कार्यक्रम सादर केले. या कर्यक्रमाचे नियोजनास श्री अक्षय भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले. भोजनापूर्वी सर्पमित्र श्री गणेश माने ह्यांनी सापांच्या विभिन्न जातींची वैशिष्ट्ये व सर्पदंशावरील प्रतिबंधात्मक उपाय या विषयवर चर्चासत्राचे आयोजन केले. भोजनानंतर विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेस चालना देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले.

दुस–या दिवशी सकाळी परतीच्या प्रवासासाठी २८ कि.मी.सायकल प्रवास करुन TOUR DE DAM (Cycle Trip) ची सांगता चंद्रशेखर आगाशे शा.शि.महाविद्यालयमध्ये संपन्न झाली. या सहलीत ४४ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. सा.फु. पुणे विद्यापीठाच्या सहलीचे निकषांच्या पूर्ततेसह सदर सहल आयोजित

करण्यात आली या सहलीमध्ये डॉ. राजे, डॉ. प्रभू, डॉ. ढेंगळे व प्रा.उपाध्याय यांनी सहभाग घेतला, डॉ. शरद आहेर सहल प्रमुख होते. सहलीस प्राचार्या डॉ. वाघचौरे व डॉ. कांगणे यांनी शुभेच्छा दिल्या

- **प्राध्यापकांची विशेष कामगिरी**
  - प्राचार्या डॉ. वाघचौरे : २०१६–१७ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती सदस्य.
  - डॉ. कांगणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व भारती विद्यापीठाच्या आर. आर. कमिटीचे आणि गोवा विद्यापीठ – शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे सदस्य.२०१६–१७ साठी उच्चशिक्षण विभागाअंतर्गत बीपीएड व एमपीएड अभ्यासक्रमाचे केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती सदस्य.
  - डॉ. अरुण शिंदे – महाराष्ट्रात विविध ठिकाणी शारीरिक शिक्षण, व्यायाम व तंदुरूस्ती विषयक व्याख्याने देतात. पद्‌व्युत्तर विभागाचे प्रमुख म्हणून काम पहातात.
  - डॉ. शरद आहेर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये बीओएस शारीरिकशिक्षण– टिचर एज्युकेशन अभ्यासमंडळाचे अध्यक्ष. पद्‌व्युत्तर विभागाचे समन्वयक म्हणून काम पहातात.
  - डॉ. आहेर व डॉ. बोडके – दि. २५ ते २७ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत पुणे विभागातील सुमारे ८५ शाळांतील २००० विद्यार्थ्यांसाठी अडथळ्यांच्या शर्यतीचे यशस्वी आयोजन केले.
  - डॉ. उज्वला राजे शालेय पाठ विभागाचे व महाविद्यालयाच्या Extension wing coordinator म्हणून काम पहातात
  - डॉ. श्रद्धा नाईक – महाविद्यालयाच्या Internal Quality Assurance Cell Coordinator म्हणून काम पहातात.
  - डॉ. एम.एन. देशपांडे संशोधन विभागाचे समन्वयक म्हणून काम पहातात,
  - प्रा. शिरिष मोरे आंतरकुल स्पर्धाविभाग व पंचकार्य विभाग सांभाळतात.
  - प्रा. कुमार उपाध्याय यांनी दि.२२ नोव्हे ते ५ डिसे.२०१६ या कालवधीत पुणे ते कन्याकुमारी ही सायकल सफारी यशस्वीपणे पार पाडली. सायकल सफारीच्या माध्यमातून त्यांनी प्रदूषणमुक्त भारत ही संकल्पना जनमानसापर्यत पोहोचविली.
    त्यांनी मार्च २०१७ मध्ये गुवाहाटी येथे झालेल्या राष्ट्रीय कुराश स्पर्धेत कांस्यपदक पटकावले.

- आमचे प्राध्यापक नेहमीच नित्य कार्याव्यतिरिक्त संशोधन अभ्यास करुन क्रीडाक्षेत्रात भर घालत असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा इ.मध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. समाजात व्यायाम व तंदुरुस्ती विषयक व्याख्याने देउन समाज प्रबोधन करतात.

आज मितीस महाविद्यालयात प्राचार्यांसह दहा प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत.महाविद्यालयात १२ पीअेच.डी. मार्गदर्शक म्हणून प्राध्यापकांना मान्यता प्राप्त आहे. या वर्षावधीत डॉ. एम.एन.देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ तर डॉ.शरद आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ डॉ. बी.एस.पोटे यांच्या मार्गदर्शनाखाली ०१ अशा ०३ विद्यार्थ्यांनी एम फिल पदवी प्राप्त केली.

- **अर्थसहाय्य**

शै. वर्ष २०१६-१७ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमा अंतर्गत क्रीडासाहित्यखरेदीसाठी रु.१ लाख व शै. उपकरणांसाठी रू.९६,०००/-अनुदान तसेच राज्यस्तरीय कार्यशाळा व चर्चासत्र आयोजनासाठी अनुक्रमे रू.६००००/- रु. ९०,०००/- मंजूर झाले.

- **पारितोषिके**

महाराष्ट्रीय मंडळातर्फे खालील खेळाडूंना क्रीडाप्राविण्यासाठी सन्मानित करण्यात आले.

श्री. पवार अनिकेत - बास्केटबॉल, कृतिका सावंत - सायकलिंग, धनंजय बर्वे - टेबलटेनिस, पवित्रा पवार- हायकिक बॉक्सिंग, सलमान चौधरी - किक बॉक्सिंग, आदित्य घुले - शरीर सौष्ठव, जनक हांडे - सॅट कोन कराटे , रेखा यळगुंदे - बॉक्सिंग, स्वाती गायकवाड, गौरी तावडे व दीपाली गायकवाड - खो खो

तसेच राज्य, राष्ट्रीय/खुल्या स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

डॉ. श्रीकांत महाडिक - यांना मंडळाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तर श्री माधव मुतालिक यांना कै.सुशांत गोडबोले स्मरणार्थ उत्कृष्ट प्रशासकीय सेवक पुरस्कार प्रदान करण्यात आले

शै वर्ष २०१६-१७ चे प्राईड ऑफ आगाशे पारितोषिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडामंडळाचे सहाय्यक संचालक, डॉ. दत्ता महादम यांना प्रदान करण्यात आले.

- **कँपस प्लेसमेंट**

विद्यार्थ्यांना नोक-या मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल द्वारे कँपस इंटरव्हयू आयोजित केले जातात. विविध नामांकित शाळा,जिम,व कंपन्यामध्ये आमच्या बीपीएड्. व एम.पी.एड् च्या विद्यार्थ्यांना नोक-या मिळतात. वर्षभरात विद्यार्थ्याना नोकरी संदर्भात सहकार्य करण्यात येते.

- **सांस्कृतिक कार्यक्रम व व्याख्याने**

वर्षभरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच प्रेरणादिन,देशभक्तिपर गीते, राष्ट्रीय सण या कार्यक्रमांचा समावेश होता. विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

| अ.क्र. | व्याख्यात्याचे नाव | विषय |
|---|---|---|
| १ | प्रा योगेश खाडिलकर | स्टेम सेल थेरपी |
| २ | डॉ. राजेंद्र कुंभार | संशोधन विषयक संदर्भ साहित्याचा अभ्यास |
| ३ | प्रा. भालचंद्र पुरंदरे | शैक्षणिक प्रकल्प |
| ४ | प्रा. भा.स. गोडबोले | ध्वजप्रणाम |
| ५ | श्री सिद्धार्थ मेहता | स्पोर्टस एव्हेंट मॅनेजमेंट |
| ६ | श्री भाई उपाले | शिक्षण व्यवस्थेतील शिक्षकाचे स्थान |
| ७ | प्रा राजेंद्र भिडे | संवाद कौशल्य |
| ८ | डॉ. सौ. भुतकर | गर्भजल निदान विरोधक कायदा |
| ९ | डॉ.कल्पना आठवले रावल | ताणतणावाचे व्यवस्थापन |
| १० | डॉ. द.वि. कुलकर्णी | मराठी दिन |
| ११ | डॉ. केनेडी डिसिल्व्हा | लाईफ स्किल कोचिंग |
| १२ | डॉ. भक्ति परचुरे | महिला दिन , नारीमुक्ती |

**शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी  बी.पी.एड्.व एम. पी.एड्. पदवीचे नियुक्त विद्यार्थी मंडळ**

| Sr. No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | Offg. Principal – Chairman | Dr. S.E.Kangane |
| 2 | Lecturer nominated by Principal | Dr. A. F. Shinde |
| 3 | Teacher in charge of National Cadet Crops | Dr. U.L.Raje |
| 4 | National Service Scheme Prog. Officer | Dr. B.S.Pote |
| 5 | Director of Sports & Phy.Edn. | Mr. S.V. More |
| 6 | Highest Academic Merit preceding year for B.P.Ed.(I$^{st}$ yr) | Mr. Sidhheshwar Kendre |
| 7 | Highest Academic Merit preceding year for B.P.Ed.(II$^{nd}$ yr) | Ms. Reshma Dhumal |
| 8 | Highest Academic Merit preceding year for M.P.Ed.I$^{st}$ Year | *Ms. Nakita Phernandes* |
| 9 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) II$^{nd}$ Year | Ms. Gomes Kevina |
| 10 | Nominated by Principal<br>Outstanding Sport Performance (U.R.) | Mr. Sahil Bagwan<br>(BPEd.II Yr) |
| 11 | Student member - N.S.S. Scheme | Mr. Macchindra Mane |
| 12 | Student member - N.C.C.  Scheme | Mr. Vikram Landage |
| 13 | Student member - Cultural Activity | Mr.Anil Parmar |
| 14 | Lady student representative | Ms. Gadhave Sanjeevani |
| 15 | Lady student representative | Ms. Pooja Walke<br>B.P.Ed. (Ist Yr) |

- **परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने एम.पी.एड्.ची परीक्षा. बी.पी.एड् व एम.पी.एड्. अभ्यासक्रमाच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कार्य डायरेक्टर डॉ. माधुरी वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.

- **ग्रंथालय**

  या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये रू.114722/- ची ग्रंथखरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 08 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके 18437, टायटल्स 13408, सीडीज 82 व व्ही.सी.डी 100 इ. उपलब्ध आहेत.

- **निवृत्ती व नियुक्ती**

  महाविद्यालयातील सहाय्यक अधिव्याख्याता डॉ. दादासो ढेंगळे यांनी दि. १८ नोव्हेंबर २०१६ रोजी राजीनामा दिला व सा.फु. पुणे विद्यापीठाच्या शा. शि. विभागात रूजू झाले. त्यांचे जागी प्रा. पल्लवी कव्हाणे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. माधुरी वाघचौरे नियत वयोमानानुसार दि.३१ जानेवारी २०१७ रोजी सेवानिवृत्त झाल्या. डॉ. सोपान कांगणे यांची दि. २ एप्रिल २०१७ पासून प्राचार्यपदी नियुक्ती करण्यांत आली आहे.

  ग्राउंडमन श्री विठ्ठल कांबळे दि.३१ मे २०१७ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

- **दु:खद निधन**

महाविद्यालयाचे विद्यार्थीप्रिय सेवानिवृत्त प्राध्यापक श्री एस.एस.भांगे यांचे दि. ७ जानेवारी २०१७ रोजी दु:खद निधन झाले.

महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस, मा. श्री धनंजय दामले यांचे प्रोत्साहन आणि आमचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख नेहमी चढता राहिला आहे.

**(डॉ. सोपान एकनाथ कांगणे )**

**12/04/2017**